# मुंबई विद्यापीठ

डॉ. सुनील पाटील
प्र. संचालक

विद्यार्थी विकास विभाग
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
‘ब’ पथ, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०
दूरध्वनी क्रं. - ८३६९७५३६४२

**परिपत्रक** क्र. ७/ २०२४

**विषय: ‘युवा रक्षा: विद्यार्थी जीवन / अपघात विमा योजना’ अंमलबजावणी बाबत**

संदर्भ: १. सदर विभागाचे परिपत्रक क्रमांक ३ दिनांक १०/०४/२०२४
२. शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण २०२१ / प्र. क. १४ / वि शि ५, दिनांक १६ ऑक्टोबर २०२३

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णय तसेच विद्यार्थी विकास विभागाच्या परिपत्रक क्रमांक ३ दिनांक १०/०४/२०२४ चे अवलोकन करावे.

सदर शासन निर्णयानुसार मुंबई विद्यापीठातील सर्व संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक आणि विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख यांनी ‘युवा रक्षा: विद्यार्थी जीवन / अपघात विमा योजना’ आपल्या महाविद्यालयात / परिसंस्थेत / शैक्षणिक विभागात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून कार्यान्वित करण्याचे आदेश आपणांस देण्यात आले आहेत.

सदर योजनेची माहिती आपल्या महाविद्यालयाच्या / परिसंस्थेच्या / शैक्षणिक विभागाच्या माहितीपुस्तिकेत (Prospectus) मध्ये नमूद करावी आणि सदर योजनेची इत्यंभूत माहिती आपल्या महाविद्यालयाच्या / परिसंस्थेच्या / शैक्षणिक विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी असे निर्देश आपणांस या पूर्वी देण्यात आलेले आहेत.

तथापी, आपणांस सूचित करण्यात येते की, युवा रक्षा: विद्यार्थी जीवन / अपघात विमा योजने बाबत खालील बाबींची त्वरित अंमलबजावणी आपण करावी-

१. विद्यार्थी विकास विभागाच्या परिपत्रक क्रमांक ३ दिनांक १०/०४/२०२४ नुसार विद्यार्थ्यांची विमा योजना युवा रक्षा: विद्यार्थी जीवन / अपघात विमा योजना’ त्वरित अंमलात आणावी.
२. दिनांक १५ जुलै २०२४ पर्यंत आपल्या महाविद्यालयांत ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयांनी संदर्भीय परिपत्रकानुसार विमा कंपनी बरोबर संपर्क करून ‘युवा रक्षा: विद्यार्थी जीवन / अपघात विमा योजना’ त्वरित सुरु करावी.
३. जे विद्यार्थी दिनांक १५ जुलै २०२४ नंतर प्रवेश घेणार आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी त्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ‘युवा रक्षा: विद्यार्थी जीवन / अपघात विमा योजना’ महाविद्यालयांनी त्वरित सुरु करावी.

SUNIL SUDAM PATIL

डॉ. सुनील पाटील
प्र. संचालक,
विद्यार्थी विकास विभाग, मुंबई विद्यापीठ

मुंबई, १५ जुलै २०२४

*प्रत: सर्व प्राचार्य, संलग्नीत महाविद्यालये, मुंबई विद्यापीठ, सर्व प्राचार्य / संचालक, मान्यताप्राप्त परिसंस्था, मुंबई विद्यापीठ व सर्व विभागप्रमुख / संचालक, शैक्षणिक विभाग, मुंबई विद्यापीठ*